ग्रामीण रुग्णालय, सांगोला जि. सोलापूर येथील ट्रामा केअर युनिट मुख्य इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-२०१९/ प्र.क्र.८९/ आरोग्य-३अ

मंत्रालय, १० वा मजला, संकूल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.

दिनांक : २१ जून, २०१९.

वाचा :-

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१४१ /आरोग्य-३, दि.१७.०१.२०१३.

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : प्रशामा-२०१५/प्र.क्र.७७ /आरोग्य-३अ, दि.१२.०६.२०१५.

३) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे / कक्ष-३ / टे-६ /सांगोलाट्रामासुधाबांध /७४८६-८७/१९, दि.१.०६.२०१९.

प्रस्तावना :-

ग्रामीण रुग्णालय,सांगोला येथे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यास संदर्भाधिन अनुक्रमांक १) येथील दि.१७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. संदर्भाधिन अनुक्रमांक २) येथील दि.०१२.०६.२०१५ च्या शासन निर्णयान्वये ट्रामा केअर युनिटच्या मुख्य इमारतीच्या बांधकामासाठी रु.४,३५,१२,५००/-(रुपये चार कोटी पस्तीस लक्ष बारा हजार पाचशे फक्त) इतक्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तथापि दरसुचीतील बदल व ट्रामा केअर युनिट ची इमारत हरीत इमारत संकल्पनेवर आधारीत बांधावयाची असल्याने संदर्भ क्रमांक ३) येथील प्रस्तावा नुसार आरोग्य सेवा संचालनालयाने ट्रामा केअर युनिटच्या मुख्य इमारतीचे अंदाजपत्रक व आराखडे सहायक अभियंता वर्ग-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सांगोला यांनी तयार केले असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर आणि उपसंचालक,आरोग्य सेवा,पुणे मंडळ,पुणे यांनी साक्षांकित केले आहे. सदरचे अंदाजपत्रक सन २०१८-१९ च्या दरसूचीवर आधारित आहे. सदरहू सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

ग्रामीण रुग्णालय, सांगोला येथील ट्रामा केअर युनिटच्या मुख्य इमारतीच्या बांधकामासाठी रु.१०४७.६० लक्ष च्या सुधारित अंदाजपत्रके व आराखडयास पुढील प्रमाणे सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	बाब	मूळ प्रशासकीय मान्यता (रु.लाखात)	सुधारित प्रशासकीय मान्यता (रु.लाखात)	फरक (रु.लाखात)	अधिक्याची कारणे
अ	**मूळ बाबी (आकस्मिक खर्चासह)**	४२९.८५	९१७.३९	४८७.५४	मूळ अंदाजपत्रक हे २०१४-२०१५ च्या दरसूचीवर आधारीत असून सुधारित अंदाजपत्रक हे सन २०१८-२०१९ च्या दरसूचीवर आधारीत आहे. तसेच Green Building गृहित धरण्यात आली असल्याने वाढ झाली आहे.
	एकूण - अ	**४२९.८५**	**९१७.३९**	**४८७.५४**	
ब	**विद्युत**				
	मूळ बाबी	३६.४६	१०७.५०	७१.०४	
	एकूण - ब	**३६.४६**	**१०७.५०**	**७१.०४**	
क	**पाणीपुरवठा**				
१	**मूळ बाबी**	३३.१५	२२.७१	(-)१०.४४	
	एकूण - क	**३३.१५**	**२२.७१**	**(-)१०.४४**	
	एकूण अ+ब+क	**४९९.४६**	**१०४७.६०**	**५४८.१४**	**अधिक्य**

२. उपरोक्त सुधारित अंदाजपत्रकाची प्रशासकीय मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक राहील.

२) सदर कामाची निविदा काढतांना प्रत्येक कामाची स्वतंत्रपणे निविदा न काढता नमूद सर्व कामांसाठी एकत्र एकच निविदा काढण्यात यावी.

३) क्षेत्रिय जागेच्या परिस्थितीनुसार व आरोग्य संस्थांच्या आवश्यकतेनुसार सुधारित अंदाजपत्रकाच्या कामाची किंमत ठरवण्यात आली असून त्या रक्कमेमधून पूर्ण होईल असे पाहावे.

४) सदरचे अंदाजपत्रक सुधारित असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिक दृष्टया मान्यता आरोग्य खात्याच्या त्या-त्या आरोग्य सेवा मंडळाच्या उप संचालकांच्या सहमतीने तरतूदी अंतिम करण्यात याव्यात.

५) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पुर्तता करुन घ्यावी.

६) सदर काम मंजूर रक्कमेत पुर्ण होईल याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदर काम उपलब्ध निधी मधून करण्यात यावे.

३. सदर सुधारित बांधकामांवरील खर्च सन २०१९-२०२० मध्ये उपलब्ध होणाऱ्या “मागणी क्र. एच-८, मुख्यलेखाशिर्ष “४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च, ०१-नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय्य), ११० -रुग्णालये व दवाखाने, (०१) (अ) - पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना-इमारती, (००) (०१)- मोठी बांधकामे (४२१० ००१४), ५३- मोठी बांधकामे” या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १७४/इमा-२, दि.९/४/२०१९ अन्वये दर्शविलेल्या सहमतीनुसार आणि वित्त विभागाच्या शा.नि. क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्ट भाग-पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ परिच्छेद क्र.१३४ नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१३१७३१३६००१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed4c738df60ac2ac776b9e2481f77ad50aba9dc28bb31a482e03c7ee7b6f64d8, serialNumber=7caa550613a8c4cb7c593368faa24e20d6f8985f510118e6fc1af8b04a443ee8, cn=Rajendra Shamraoji Kaurte
Date: 2019.06.21 17:20:10 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
२. मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधान सभा/विधान परिषद विधानमंडळ सचिवालय मुंबई
३. मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४. महालेखापाल १ / २, महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा) / लेखा व अनुज्ञेयता, मुंबई/ नागपूर.
५. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
७. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई
८. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा),आरोग्य सेवा, पुणे.
९. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई/ पुणे.
१०.उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे.
११.जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर
१२.जिल्हा शल्य चिकित्सक,सोलापूर
१३.सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई.
१४.विनियम कार्यासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६.अवर सचिव (आरोग्य-३), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७.निवडनस्ती (आरोग्य-आ३अ).